पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १३**

सभावृत्तांत

**दिनांक - १८/०२/२०१५** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितिची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१८/०२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नेटके सुमन राजेंद्र
२) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
४) मा.जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.सभापती हे सभागृहात उपस्थित नसल्याने मा.शहर सुधारणा समिती सदस्या मा.नेटके सुमन राजेंद्र यांची सभाध्यक्ष म्हणून निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(मा.नेटके सुमन राजेंद्र यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

----------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.आशा सुर्यवंशी                                 अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

शहर सुधारणा समितीची कार्यपत्रिका क्रमांक १३ दिनांक १८/०२/२०१५ ची सभा दिनांक ०४/०३/२०१५ रोजी दुपारी २.४५ पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

**सभाध्यक्षा –** बुधवार दिनांक ०४/०३/२०१५ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **सुमन राजेंद्र नेटके** )
**सभाध्यक्ष**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १३**

सभावृत्तांत

( दिनांक १८/०२/२०१५ ची तहकूब सभा )

**दिनांक - ०४/०३/२०१५** **वेळ - दुपारी २.४५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक **१८/०२/२०१५** ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०४/०३/२०१५** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा.नेटके सुमन राजेंद्र
३) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५) मा.जवळकर वैशाली राहुल
६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – सह शहर अभियंता, मा.शिंपी – नगररचनाकार, मा.भागवाणी – उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

दिनांक ०४/०२/२०१५ व ०९/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – १

दिनांक – ०४/०३/२०१५

सुचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ – मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून इमारतीचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे आणि त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार अगोदर मंजूर कलेल्या आराखडयामधील पुर्नविकास करता येत नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयातील सोसायटी

स्थापन झालेनंतर एकत्रित जागेमध्ये कोणत्याही प्रकारची विभागणी, बदल एकत्रित जागेवर करता येणार नाही आणि तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी प्राप्त करुन घेतल्याखेरीज करता येणार नाही. आणि ज्याअर्थी आराखडयात विविध प्रकारच्या इमारती उदा.सदनिकांच्या इमारती/रोहाऊसेस/दुहेरी बंगला/सुखसुविधा इमारत इ.चा समावेश आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी घेण्यापूर्वी सोसायटी/संस्थेची/दालनाची/सभासदांची (बहुमत/ठराव) लेखी संमती घेणे आवश्यक आहे. आणि मंजूर आराखडयातील समाविष्ट उपलब्ध कोणत्याही सोयी-सुविधा दर्शविलेल्या संबंधित जागेवर अथवा इमारतीमध्ये सर्व सभासदांस उपभोगासाठी वापरता येतील. याप्रमाणे धोरण निश्चित करण्याकरीता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२२१/२०१५
दिनांक : ०७/०३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.